


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे   अंक : १५२ वा गुरूवार दि. २४ जुलै २०२५ पृष्ठ ८   किंमत ३ रुपये

# अशोक चव्हाणांची डोकेदुखी वाढली काँग्रेसकडून खिंडीत पकडण्यासाठी प्लॅन तयार, नांदेडमध्ये काय घडतंय?

**वृत्तसंस्था/नांदेड**

नांदेडमध्ये आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ट्विस्ट निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण पक्ष सोडून भाजपमध्ये गेलेले माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना घेरण्यासाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी एकत्र येण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे खासदार रविंद्र चव्हाण आणि वंचितचे राज्य उपाध्यक्ष फारुख अहमद यांच्यात चर्चा झाली आहे. यामुळे अशोक चव्हाण यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. नांदेडमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे बिगुल लवकरच वाजणार आहे. त्यामुळे सर्व पक्ष तयारीला लागले आहेत. जिल्ह्यात नेहमीच काँग्रेसचं वर्चस्व राहिलं आहे. यापूर्वी अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने महापालिका, जिल्हा परिषद आणि नगरपालिकांमध्ये सत्ता मिळवली आहे. पण आता अशोक चव्हाण भाजपमध्ये गेल्यामुळे चित्र बदललं आहे. काँग्रेसमधील अनेक माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे निवडणुकीत चुरस वाढणार आहे. अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजप पहिल्यांदाच स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढवणार आहे. काँग्रेसला टक्कर देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीसोबत युती करण्याचा विचार सुरू आहे. काही दिवसांपूर्वी रविंद्र चव्हाण आणि फारुख अहमद यांच्यात याबाबत चर्चा झाली. दोन्ही नेत्यांनी युतीचे संकेत दिले आहेत. नांदेड महानगरपालिकेत दलित आणि मुस्लिम नगरसेवकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे युती झाल्यास मतांची विभागणी टळेल आणि दोन्ही पक्षांना फायदा होईल, असं बोललं जात आहे. काँग्रेसचे खासदार रविंद्र चव्हाण म्हणाले, वंचित सेक्युलर पक्ष आहे. त्यांच्याकडून प्रस्ताव आल्यास आम्ही विचार करूङ्ङ. तसंच ते पुढे म्हणाले, ङ्ङयुतीबाबत चर्चा झाली नाही. पण वंचितकडून प्रस्ताव आल्यास जिल्हा कार्यकारणी विचार करेल आणि प्रदेश काँग्रेसचा सल्ला घेऊन निर्णय घेईल. युती झाल्यास सेक्युलर मतांची विभागणी टळेल आणि दोन्ही पक्षांना फायदा होईल,ङ्ङ अशी अपेक्षा खासदार चव्हाण यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, वंचितचे राज्य उपाध्यक्ष फारुख अहमद यांनीही याबाबत आपली प्रतिक्रिया दिली आहे. काँग्रेसचे खासदार रविंद्र चव्हाण यांनी



युतीबाबत सकारात्मकता दाखवली असेल, तर आम्ही स्वागत करतो. मात्र खासदार चव्हाण यांना युतीबाबत बोलणी करण्याचे अधिकार पक्षाने दिले आहेत का? मागील लोकसभा आणि विधानसभेच्या वेळेस काँग्रेसने युतीबाबत चर्चा केली, पण ती चर्चा पूर्ण झाली नाही, तसे होऊ नये, याची काळजी घेणे गरजेचे आहे, असं फारुख अहमद यांनी म्हटलं आहे.

# मोहेगावमध्ये अतिक्रमण काढणीवरून मोठा गोंधळ!

## गावकऱ्यांचा पोलिसांवर हल्ला,जवान व कॉन्स्टेबल गंभीर जखमी!

**जनसंचलन/बुलढाणा**

तालुक्यातील घाटाखाली असलेल्या मोहेगावात अतिक्रमण काढणीच्या कारवाईदरम्यान भीषण गोंधळ उडाला. प्रशासन आणि पोलीस कर्मचारी अतिक्रमण हटवण्यासाठी पोहोचले असता स्थानिक ग्रामस्थांनी आक्रमक होत पोलिसांवर थेट हल्ला चढवला. या हल्ल्यात जवान नंदकिशोर उदावणे आणि पोलीस कॉन्स्टेबल राजेश मानकर हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून मोहेगावमधील अतिक्रमण काढण्याचा मुद्दा चिघळलेला असून, याआधी सुद्धा गावकरी बोरा (वस्ती विस्तार) मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलनासाठी आले होते. मात्र आजची घटना प्रशासनासाठी चिंतेची घंटा ठरत आहे. अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईचा ग्रामस्थांनी तीव्र विरोध करत अचानक हल्ला केल्याने परिस्थिती तणावपूर्ण झाली. या हल्ल्यात जवानासह अनेक पोलीस कर्मचारी जखमी झाले असून, काहींवर मोताळा येथे उपचार सुरू आहेत. पोलीस यंत्रणेला रोषाचा सामना करावा लागत आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी संयम राखत परिस्थिती नियंत्रणात आणली असली तरी या घटनेनंतर ग्रामस्थ आणि




प्रशासन यांच्यातील तणाव आणखी वाढण्याची शक्यता आहे.पोलिसांवर हल्ला ही अत्यंत गंभीर बाब असून संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल, अशी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीला तीन वर्षे सश्रम कारावास



**जनसंचलन/बुलढाणा**

तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी बुलढाणा येथील विशेष न्यायालयाने बुधवारी आरोपी अशोक समाधान मगर याला पोक्सो कायद्यान्वये तीन वर्षे सश्रम कारावास व दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. विशेष म्हणजे, या गुन्ह्यात सहभागी असल्याबद्दल न्यायालयाने आरोपीच्या आई-वडिलांनाही प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. ही घटना तालुक्यातील एका गावातील तलाव परिसरात घडली. पीडित अल्पवयीन मुलगी कपडे धुण्यासाठी गेली असताना आरोपी अशोक मगर याने तिचा विनयभंग केला. त्यानंतर मुलगी घरी आल्यानंतर आरोपीने त्यांच्या घरासमोर येऊन शिवीगाळ केली. पीडित मुलीचे वडील व आजी त्याला समजावण्यास गेले असता, आरोपीसह त्याचे वडील समाधान मगर आणि आई गीता मगर यांनी त्यांना मारहाण केली. प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. २५ फेब्रुवारी २०२० रोजी ही घटना घडली होती. सरकारी पक्षातर्फे ॲड. संतोष खत्री यांनी काम पहाले.

# शक्तिहीन संस्थांची साखळी...

## संपादकीय लेख

दोन वर्षांपूर्वीच, अमेरिकेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकवार डोनाल्ड ट्रम्प हे विराजमान होतील; आणि त्यांनी पदग्रहण केले की अख्ख्या जगाची ड्ढरोलर कोस्टर राइडफ सुरू होईल, आणि आपल्याला सीटबेल्ट्स बांधूनच बसावे लागेल, असे मी तेव्हाचा एकूण रागरंग बघून लिहिले होते. ते इतके खरे होईल आणि तेही इतक्या लवकर मूर्तरूपात येईल, याचा माझ्यासह कुणालाच अंदाज नसावा! पण अखेरीस तसेच झालेले समोर दिसते आहे. आणि वेगाने सुरू असलेली ड्ढरोलर कोस्टर राइडफ थांबेल, अशी कुठलीही चिन्हे सध्या तरी दिसत नाहीत. वरवर पाहता दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीनंतर अस्तित्वात आलेल्या अमेरिकाकेंद्रित एकध्रुवीय जगाचे रूप आरपार, पूर्णतः बदलून ते बहुध्रुवीय होत चालले आहे, हे जरी जगरहाटी बदलण्यामागील एक महत्त्वाचे कारण असले तरी ते एकमेव कारण नाहीये. त्यास इतरही काही कारणे आहेत. भूराजकीय पटलावर अखंडपणे चालू राहणारे दृश्य-अदृश्य बदल अशी जगरहाटी बदलण्याचे काम करीत असतात, हे लक्षात घ्यायला हवे या सगळ्या बाबींवर भाष्य करायची ही वेळ येऊन ठेपली आहे ती मागच्या दोन महिन्यांमध्ये घडलेल्या काही महत्त्वपूर्ण जागतिक घडामोडींमुळे. या अशा घडामोडी होत्या ज्यावर ना जगाने लक्ष केंद्रित केले, ना विचार धुरिणींनी या घटनांकडे पुरेशा गाभीर्याने, पुरेशा काळजीपूर्वक पाहिले. महत्त्वाचे म्हणजे या घटनांमध्ये सहभागी असलेल्या संस्था काही अगदीच कचकड्याच्या वा सुमार अशा नव्हत्या; तरीही त्यांच्या बैठका, त्यातील निर्णय, त्यातील जाहीरनामे जगाने पुरेसे गांभीर्याने घेतले नाहीत. हे चित्र पाहता या संस्था आता पुरत्या शक्तिहीन होत चालल्या आहेत की काय, अशी शंका यावी इतकी पिछेहाट या संस्थांच्या व्यक्तिमत्त्वांची झालेली दिसते. आपण याचा कालगणनेनुसार मागोवा घेवू. कॅनडाच्या अल्बर्टा प्रांतातील कनानास्किस या निसर्गरमय ठिकाणी १५ जून ते १७ जून या दरम्यान कॅनडाच्या अध्यक्षतेखाली जी ७ शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेची फलश्रुती मोठी निराशाजनक आहे. ड्ढजी ७फ हा जगातील अतिश्रीमंत, बलशाली अशा सात देशांचा गट आहे. यात कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, ब्रिटन आणि अमेरिका या केवळ सात अतिप्रगत देशांचा अंतर्भाव होतो. या वेळच्या परिषदेला निमंत्रित देशांमध्ये ऑस्ट्रेलिया, ब्राझील, भारत, मेक्सिको आणि दक्षिण कोरिया यांचाही समावेश होता. या परिषदेवर इराण-इस्रायल युद्धाचे सावट असल्याने परिषदेला हजर असलेले अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे परिषद अर्धवट सोडून त्यांच्या देशात परतले. शिवाय या शिखर परिषदेअंती कुठलेही संयुक्त निवेदनही प्रसिद्ध करण्यात आले नाही. स्पेनच्या सेव्हिल या शहरात दि. ३० जून ते दि. ३ जुलै दरम्यान संयुक्त राष्ट्रसंघातर्फे दर दहा वर्षांतून एकदा भरवली जाणारी जागतिक विकासासाठीच्या अर्थसाह्यासाठीची परिषद अशाच प्रकारे दुर्लक्षित झाली. जगभरातले ७० राष्ट्रप्रमुख वा अन्य ज्येष्ठ नेते ह्या परिषदेला निमंत्रित होते. तर जी ७ गटापैकी केवळ फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन त्यास हजर होते. अमेरिकेने तर या परिषदेकडे पूर्णतः पाठ फिरवली. संयुक्त राष्ट्रसंघाची २०३० पर्यंतची ड्ढशाश्वत विकास ध्येयेफ आहेत. गरिबी निर्मूलन, शून्य भूक, चांगले आरोग्य, दर्जेदार शिक्षण, लैंगिक समानता आणि हवामान बदलाचा सामना करण्याची कारवाई यासारख्या महत्त्वाच्या विषयांचा जागतिक स्तरावर धांडोळा घेतला जातो. पण अमेरिका जशी जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडली त्याचीच पुनरावृत्ती करीत सेव्हिल परिषदेतदेखील सहभागी झाली नाही. ब्राझीलच्या रिओ दी जानेरो या शहरात दिनांक ६ व ७ जुलै रोजी भरविण्यात आलेली ब्रिक्स संघटनेची सतरावी बैठक ही अगदी आत्ताची घटना आहे. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाच संस्थापक देशांशिवाय इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, इराण, सौदी अरेबिया आणि युनाइटेड अरब अमिरेट्स या सहा नव्या सदस्यदेशांचे प्रतिनिधी या बैठकीत हजर होते. या शिवाय नायजेरिया, युगांडा आणि व्हिएतनाम हे देश देखील भागीदार देश म्हणून या बैठकीला आमंत्रित होते. हवामान बदल, जागतिक सहकार्य, जागतिक सुरक्षा आणि व्यापार या मुख्य विषयांभोवती या बैठकीची विषयपत्रिका गुंफलेली झाली. फार कुठे गवगवा जरी केला जात नसला तरी जागतिक स्तरावर असलेल्या अमेरिकी आणि युरोपियन वर्चस्वाला लगगाम घालण्याचा पण या ब्रिक्स सदस्यांनी केला असल्याचे अगदीच स्पष्ट होते आहे. गरीब देशांना आर्थिक मदत देण्यासाठी स्थापण्यात आलेली ड्ढन्यू डेव्हलपमेंट बँकफ हे त्या अनुषगाने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. पण या ड्ढब्रिक्सफ गटातील देशांमधील आपापसातील कुरघोडी तथाकथित एकीच्याच मुळावर उठणारी ठरते आहे.


---

# जिल्हयातील ८ मंडळात ढगफुटीसदृश्य पाऊस नुकसानीची

## तात्काळ पंचनामे करा- केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव

जनसंचलन/बुलढाणा

१ जुलै रोजी बुलढाणा जिल्हयातील ८ मंडळ क्षेत्रामध्ये ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यामुळे या मंडळ क्षेत्रामध्ये घरांचे आणि शेतजमिनीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. झालेल्या नुकसानीची तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहे. बुलढाणा जिल्हयातील लोणार तालुक्यातील २१ जुलै ला ढगफ टीसदृश्य पाऊस झाला. या पावसामुळे नदि नाले तुडूंब भरुन वाहु लागले. पावसाचे पाणी घरात शिरल्यामुळे अनेक कुटूंबांच्या घरांचे व घरातील सामानांचे नुकसान झाले आहे. तर शेतजमिनही खरडुन गेले आहे. २१ जुलै ला लोणार येथे १७१.८ मि.मि., टिटवी येथे १५४.५ मि.मि., हिरडव येथे १८४.५ मि.मि., शेगांव तालुक्यातील जवळा १७७.३ मि.मि., खामगांव तालुक्यातील पळशी येथे १५१ मि.मि. पावसाची नोंद २१ जुलै च्या मध्यरात्री झाली आहे. त्यामुळे या मंडळ क्षेत्रामध्ये



शेतजमिनीचे आणि घरांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या शेतजमिनीचे कृषी विभाग, महसुल विभाग आणि पिक विमा कंपनीच्या प्रतिनीधी समवेत तात्काळ पंचनामे करण्यासंदर्भात आपल्या स्तरावरुन संबधित विभागांना निर्देशित कराव्यात अशा सुचना जिल्हाधिकारी बुलढाणा यांना देण्यात आल्या आहे.

---

# साबांविचे दुर्लक्ष, स्मशानभूमीत पार्थिव नेता येत नाही

## मुलांनी शाळेत जायचे कसे?

जनसंचलन/ देऊळगाव राजा

तालुक्यातील पिंप्री आंधळे गावातला मुख्य रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत असून या रस्त्याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने सततच्या पावसामुळे रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे.या रस्त्याचे तातडीने खडीकरण करून देण्याची मागणी पिंप्री आंधळेच्या सरपंच सौ. अंजली आंधळे व ग्रामस्थांनी संबधित अधिकाऱ्यांकडे केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सचिन वाघ, शाखा अभियंता महेश भाले यांना दिलेल्या निवेदनात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत अंढेरा ते डोड्रा हा रस्ता असून सदर रस्ता हा पिंप्री आंधळे गावातून मुख्य मार्गाने गेलेला आहे.या रस्त्याच्या संदर्भात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना गावाच्या वतीने सरपंच यांनी वारंवार सूचित केलेले होते.मात्र त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष दिलेले नाही.सदर रस्ता हा गावातल्या मुख्य मार्गाने गेलेला असल्याने या रस्त्यावरून ये-जा करताना ग्रामस्थांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे.या मार्गावर देवी देवतांचे मंदिर असून सकाळ संध्याकाळ मंदिरामध्ये हरिपाठ, भजन व आरती करण्यासाठी ग्रामस्थांना जाणे शक्य नाही,या संपूर्ण रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाल्याने वयोवृद्धांना पाय घसरून गंभीर दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.याच मुख्य मार्गावर गावातली हिंदू स्मशानभूमी असून रस्ता अतिशय खराब झालेला असल्याने अंत्यसंस्कारासाठी पार्थिव सुद्धा नेणे मुश्किल झाले आहे.अंत्यविधी व रक्षा विसर्जनासाठी आलेल्या नागरिकांना या रस्त्याने स्मशानभूमीत जाणे शक्य नाही, गावात येणारा रस्ता हा अत्यंत खराब असल्याने गावातील अंगणवाडीत प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मुला मुलींना या रस्त्याने जाणे बंद झाले आहे.तसेच बाहेरगावी शिकायला जाणाऱ्या मुला-मुलींना नेण्यासाठी येणाऱ्या स्कूल बसेस या गावाच्या बाहेरच थांबत असल्याने दररोज पालक त्यांच्या मुलांना घेऊन या स्कूल बसेस पर्यंत सोडतात. सदर रस्ता हा सार्वजनिक बांधकाम



विभागाच्या अखत्यारीत येत असल्याने या रस्त्यावर ग्रामपंचायतला काम करता येत नाही,अंढेरा फाटा ते डोड्रा हा रस्ता मंजूर झालेला नाही, तो पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयापासून ते मल्हारी आंधळे यांच्या घराच्या जवळच्या डोड्रा पांधीच्या कॉर्नर पर्यंत तातडीने या रस्त्याचे खडीकरण करून देण्याची मागणी करत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.पिंप्री आंधळेच्या सरपंच सौ.अंजली आंधळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# पेच सुटला, सस्पेन्स संपला; ४४-३३-२३चा फॉर्म्युला ठरला; महायुतीचा निर्णय झाला...



**मुंबई:** राज्यात महायुतीचं सरकार पुन्हा आल्यानंतर पालकमंत्रिपदांवरुन, मंत्रिपदांवरुन वाद झाले. भाजप , राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्यामध्ये अनेक जिल्ह्यांमध्ये, मतदारसंघांमध्ये वर्चस्वाची लढाई सुरु आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांआधी तिन्ही पक्ष ताकद वाढवत आहेत. विरोधकांची अवस्था दयनीय झालेली असल्यानं आता महायुतीमधील मित्रपक्षांमध्येच स्पर्धा सुरु झाली आहे. तब्बल २३० आमदार सत्तेत असल्यानं अनेकांना इच्छा असूनही मंत्रिपदी संधी मिळालेली नाही. त्यामुळे सत्तेचे लाभ मिळत नसल्यानं आमदार नाराज आहेत. त्यांची नाराजी दूर करण्यासाठी आता महायुतीनं एक महत्त्वाचा फॉर्म्युला तयार केला आहेविधानसभा निवडणुकीत भाजपनं १३२ जागांवर यश मिळवलं. तर शिंदेंच्या शिवसेनेला ५७ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ४१ जागा मिळाल्या. त्यानंतर सरकार स्थापन झालं. सत्तेतील आमदारांची संख्या खूप जास्त असल्यानं अनेकांच्या मंत्रिपदाच्या स्वप्नावर पाणी फेरलं गेलं. त्यामुळे तिन्ही पक्षांमधील नाराज आमदारांची संख्या मोठी आहे. यातील काहींनी त्यांची नाराजी जाहीरपणे बोलूनही दाखवली. हीच नाराजी दूर करण्यासाठी महायुतीनं फॉर्म्युला तयार केला आहे.मंत्रिपदांनंतर महत्त्वाच्या असलेल्या महामंडळांच्या वाटपांसाठी महायुतीत सूत्र तयार केलं आहे. त्यानुसार महामंडळांचं वाटप केलं जाणार आहे. संख्याबळानुसार महामंडळांचं वाटप केलं जाणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. त्यानुसार महायुतीमधील भाजपच्या वाट्याला ४४, शिंदेंच्या शिवसेनेच्या ३३ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या वाट्याला २३ महामंडळं येणार आहेत. त्यामुळे मंत्रिपदं हुकलेल्या, विधानसभेला पराभूत झालेल्या, तिकीट कापण्यात आलेल्या किती जणांना महामंडळांवर संधी मिळते, हे पाहणं महत्त्वाचं असेल.राज्यात येत्या काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. त्यासाठी नेत्यांना बळ देणं गरजेचं असणार आहे. आजी-माजी आमदारांना महामंडळं देऊन त्यांची नाराजी दूर केली जाऊ शकते. महामंडळांच्या जबाबदाऱ्या देऊन या नेत्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी कामाला लागण्याच्या सूचना दिल्या जाऊ शकतात. आता तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते महामंडळांवर कोणाकोणाची नियुक्ती करणार याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

## मला त्याचा इतका तिरस्कार वाटायचा... अडीच वर्षांचा लेक काळानं नेला; नाना पाटेकर काय म्हणाले?



**मुंबई -** सुप्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर कायम त्यांच्या वक्तव्यामुळे चर्चेत असतात. नाना पाटेकर मुलाखतीदरम्यान त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल खुलेपणानं भाष्य करतात. नुकत्याच एका मुलाखतीदरम्यान नाना पाटेकर यांनी त्यांच्या सिगारेटच्या व्यसनाबद्दल आणि मुलाच्या निधनाबद्दल भाष्य केलं आहे.नाना पाटेकर यांनी नुकतीच द लल्लनटॉपला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान सिगारेटच्या व्यसनाबद्दल सांगताना नाना पाटेकर म्हणाले की, मी माझ्या बहिणीमुळे सिगारेट सोडली होती. तिनं तिचा एकुलता एक मुलगा गमावला होता. त्यावेळी मी दिवसाला जवळपास ६० सिगारेट ओढायचो. मी आंघोळ करतानाही सिगारेट ओढायचो. पण ही खूप वाईट गोष्ट आहे. वासामुळे माझ्या गाडीत कोणीही बसत नव्हतं. मी कधीही दारू पीत नव्हतो पण खूप स्मोक करायचो. माझ्या बहिणीने मला धूम्रपान केल्यानंतर खोकताना पाहिलं. ती म्हणाली की, तुम्हाला आणखी काय पाहायचं आहे? हे ऐकून मी खूप दुःखी झालो आणि त्या दिवसापासून मी सिगारेट सोडली.नाना पाटेकर यांच्या मोठ्या मुलाला डोळ्याची समस्या होती. तो पाहू शकत नव्हता. त्याबद्दल सांगताना नाना पाटेकर म्हणाले की, मला त्याचा इतका तिरस्कार वाटू लागला की, जेव्हा मी त्याला पाहिलं तेव्हा मला वाटलं की, नानाच्या मुलाबद्दल लोक काय विचार करतील. त्याला काय वाटतं किंवा तो कसा वाटतो याचा मी विचार केला नाही. मी फक्त माझ्या मुलाबद्दल लोक काय विचार करतील याचा विचार केला. त्याचं नाव दुर्वासा होतं. त्याने आमच्यासोबत अडीच वर्षे घालवली पण तुम्ही काय करू शकता. आयुष्यात काही गोष्टी निश्चित असतात.माझा दृष्टिकोन नेहमीच संयमी राहिला आहे, आम्ही वर्षानुवर्षे एकत्र राहत नव्हतो आणि जेव्हा मी त्यांच्या आयुष्यापासून दूर होतो तेव्हा माझी पत्नी माझ्या वृद्ध आईची काळजी घेत होती. मी रडत नाही, मी फक्त चित्रपटांमध्ये रडतो आणि तेही पैशासाठी. असं नाना पाटेकर यांनी पुढे सांगितलं.

## स्वतःला अजय देवगण समजायचो, आईचे दागिने गहाण ठेवले, तो रिॲलिटी चेक प्रथमेशने सांगितला कठीण काळ



**मुंबई -** प्रथमेश परब हा मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेता असून त्याला टाईमपास या सिनेमातील दगडूच्या भूमिकेनं प्रसिद्धी मिळाली. सध्या प्रथमेश त्याच्या मुंबई लोकल या सिनेमामुळे चर्चेत आहे. पण, इंडस्ट्रीमध्ये इथवर पोहोचण्याचा प्रथमेशचा प्रवास सोपा नव्हता. त्याबद्दल नुकत्याच एका मुलाखतीमध्ये त्यानं भाष्य केलं आहे. प्रथमेश परबने नुकतीच राजश्री मराठीला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान त्यानं संघर्षाबद्दल सांगितलं आहे. अभिनेत्यानं आईचे दागिनेसुद्धा गहाण ठेवल्याचं सांगितलं. प्रथमेश परब म्हणाला की, मला जेव्हा म्हाडाचं घर लागलं, म्हाडाचं लागलं प्रथमेश परबला घर असं जेव्हा हेडलाईनमध्ये आलं तेव्हा सगळ्यांनी माझं अभिनंदन केलं. काही दिवसांनी मला ते घर मिळालं. इएमआयचं काय करणार? आणि माझे दोन इएमआय बाऊन्स होणार होते, कारण माझ्याकडे पैसेच नव्हते. तर मी माझ्या मावशीच्या मुलाकडून आणि आत्येच्या मुलाकडून पैसे घेतले आणि ते इएमआय भरलं. तेव्हा काम कमी होतं. कारण, ३५% जेव्हा अडकला होता, तेव्हा मी स्वतःला अजय देवगण समजत होतो. एका वर्षात एक सिनेमा करेन, दोनच सिनेमे करणार आणि सिलेक्टिव्ह राहणार. पण होतं काय, मराठी सिनेमात काम करत असताना रिलीज कधी होईल हे तुमच्या हातात नसतं आणि निर्मात्यालाही समजून घेणं गरजेचं आहे.त्यामुळे मी नंतर सिनेमाचे नंबर्स वाढवले. पण त्यावेळी जेव्हा माझ्याकडे पैसे नव्हते तेव्हा असं झालं की, आपण आपलं घर तर घेतलंय पण त्याचा इएमआय कसा भरायचा? आणि मी माझ्या आईचे दागिने गहाण ठेवले होते. आपण सेलिब्रिटी आहोत असं लोक म्हणतात. पण टाईमपास, बालक-पालक एवढे सिनेमे केल्यानंतर आईचे दागिने गहाण ठेवायला लागतात. हा रिॲलिटी चेक होता. जेव्हा मी जे दागिने सोडवले, तेव्हा मला खूप आनंद झालेला. असं प्रथमेशने पुढे सांगितलं.दरम्यान, प्रथमेश परबच्या आगामी सिनेमाबद्दल सांगायचं तर या सिनेमात त्यानं मुख्य भूमिका साकारली असून त्याच्यासोबत ज्ञानदा रामतीर्थकरसुद्धा मुख्य भूमिकेत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ग्राहकाचा गॅलरीतून इशारा अन् पोलिसांचा छापा, हॉटेलमध्ये भलतंच सुरु, सात महिलांची सुटका...

**छत्रपती संभाजीनगर:** डमी ग्राहकाने हॉटेलमध्ये जाऊन शरीर संबंधासाठी महिलेची मागणी केली. हॉटेल मालकाने होकार देत पाचशे रुपये खर्च सांगितला. ग्राहक हॉटेलमध्ये गेला हॉटेलच्या मॅनेजरने सांगितलेली महिला आली आणि डमी ग्राहकाने गॅलरीत येऊन इशारा केला. इशारा करताच पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने हॉटेलवर छापा मारला आणि हॉटेल भांडाफोड झाला.यात एका स्थानिक महिलेसह सहा आंतरराज्य महिलांची सुटका करण्यात आली. दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सागर गणेश साळुंखे वय २७ राहणार अण्णाभाऊ साठे नगर चिकलठाणा, राजेश भाऊसाहेब मगरे २६ राहणार देवगाव तांडा तालुका बदनापुर जिल्हा जालना असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अधीक्षक कार्यालयातर्फे देण्यात आलेल्या माहितीनुसार, गुप्त बातमीदार तर्फे मिळालेल्या माहितीनुसार करमाड पोलीस ठाणे हद्दीत हसनाबादवाडी येथे हॉटेलमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, उपविभागीय अधिकारी पूजा नागरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर, पोलीस उपनिरीक्षक विनोद भालेराव, प्रताप नवघरे, स्वप्निल नरवडे यांच्या पथकाने सापळा रचला.डमी ग्राहक बनवून दिनेश लॉजिंग अँड बोर्डिंग येथे



पाठवला. ग्राहकाने मॅनेजर गणेश साळुंखे याला शरीर संबंधासाठी महिलेची मागणी केली यावेळी मॅनेजरने होकार देऊन पाचशे रुपये स्वीकारून पहिल्या मजल्यावर १०५ खोली क्रमांक मध्ये पाठवलं. ग्राहक रूम मध्ये गेल्यानंतर महिला रूम मध्ये आली यावेळी गॅलरीत येऊन डमी ग्राहकाने पथकाला इशारा केला. इशारा मिळतच पथकाने हॉटेलवर छापा मारत १ स्थानिक महिलेसह ६ परराज्यातील महिलांची सुटका केली. तर ९५ हजार ८५० किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली असेल करमाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुंबई–कसारा लोकल ट्रेनवर दरड कोसळली, प्रवासी जखमी, काय घडलं?

**मुंबई :** मुंबईहून कसाऱ्याला जाणाऱ्या लोकलवर दरड कोसळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. लोकल ट्रेन ही मुंबईकरांची लाईफलाईन मानली जाते. मुंबई शहर आणि उपनगराला जोडणारी ही महत्त्वाची दुवा आहे. दररोज लाखो प्रवासी लोकल ट्रेनने प्रवास करतात. मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यात सध्या मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडतोय. त्यामुळे त्याचा पहिला फटका लोकल ट्रेनवर बसताना दिसतो. सध्या लोकल ट्रेनच्या वेळापत्रकावर फार काही फरक पडल्याचं वृत्त नाही. पण कसाऱ्याला जाणाऱ्या ट्रेनवर दरड कोसळल्याची मोठी बातमी समोर आली आहे. दरड कोसळल्याने दोन प्रवासी जखमी झाल्याची माहिती आहे. संबंधित घटना ही रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारासची असल्याची माहिती मिळत आहे. मुंबईहून कसाऱ्याला जाणारी ट्रेन ही कसारा रेल्वे स्थानकाजवळ पोहोचत होती. पण कसारा रेल्वे स्थानकाजवळ एका टेकडीवरची दरड लोकल ट्रेनवर



घसरले. यामुळे लोकल ट्रेनच्या दरवाज्यावर उभे असलेले दोन प्रवासी जखमी झाले आहेत. यापैकी एका प्रवाशाच्या पायाला गंभीर स्वरुपाची दुखापत झाल्याची माहिती मिळत आहे. मोठे दगड आणि माती लोकल ट्रेनवर कोसळले. यापैकी काही दगड आणि माती लोकल ट्रेनच्या दरवाजातून आतमध्ये गेले. या घटनेचा फोटो देखील समोर आला आहे.या घटनेनंतर जखमींना जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं आहे. त्यांच्यावर तिथे उपचार सुरु आहेत. तर स्थानिक प्रशासन घटनास्थळी दाखल झालं आहे. अशा प्रकारची घटना पुन्हा घडू नये यासाठी उपाययोजना केली जात आहे. पण या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. सुदैवाने मोठी दरळ कोसळली नाही. अन्यथा मोठी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता होती.दरम्यान, सध्या पावसाचे दिवस सुरु आहेत. मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडतोय. हवामान विभागाकडून पावसाचा अलर्ट देखील जारी करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना सुरक्षित राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. नागरिकांनी काळजी घ्यावी, असं वारंवार आवाहन करण्यात येत आहे. पावसामुळे शक्यतो लोकल ट्रेनच्या दरवाजा असलेल्या भागात उभं राहणं प्रवाशांनी टाळलं पाहिजे. अन्यथा अशाप्रकारच्या घटनांमध्ये हानी होण्याची भीती असते

## भारतीय खेळाडूंनी थाटात सांगितलं खेळणार नाही, पण आधीच... शाहिद आफ्रिदीचा गंभीर आरोप...

**मुंबई :** वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स २०२५ स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पाकिस्तान संघाविरुद्ध खेळणार नसल्याचं सांगितलं होतं. सुरुवातीला शिखर धवन याने आपण खेळणार नसल्याचं सांगितलं होतं. त्यानंतर इतर खेळाडूंनीही अशीच भूमिका घेतल्याने आयोजकांनी सामना रद्द करण्याचा निर्णय घेतलेला. दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला होता. यावरून मात्र आफ्रिदीने नाराजी व्यक्त केली होती. आम्ही येथे क्रिकेट खेळायला आलो आहोत. मी नेहमीच सांगितले आहे की क्रिकेटला राजकारणापासून दूर ठेवले पाहिजे. खेळाडू हा आपल्या देशाचा चांगला राजदूत असावा, शरमेचं कारण नसावा. आम्ही येथे क्रिकेट खेळायला आलो आहोत. जर भारताला पाकिस्तानविरुद्ध खेळायचे नसेल, तर त्यांनी येथे येण्यापूर्वीच नकार द्यायला हवा होता. पण आता तुम्ही आला आहात, सरावही केला आहे आणि मग अचानक एका दिवसात सर्व काही बदलल्याचं शाहिद आफ्रिदी म्हणाला.भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण संबंधांमुळे हा निर्णय घेण्यात आला, ज्यामुळे स्पर्धेच्या आयोजनात अडचणी निर्माण झाल्या. शिखर धवनने भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सध्याची परिस्थिती पाहता सामन्यात न खेळण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले. या परिस्थितीमुळे वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्सने सामना रद्द केला आणि आयोजकांनी भारतीय लीजेंड्सना झालेल्या ङ्कअसुविधेबद्दलङ्क माफी मागितली. खेळ लोकांना जवळ आणतात, पण जर राजकारण प्रत्येक गोष्टीत सामील झाले, तर आपण कसे पुढे जाणार? जोपर्यंत आपण बसून मुद्द्यांवर चर्चा करत नाही, तोपर्यंत काहीही सुधारणार नाही. आम्ही येथे क्रिकेट खेळायला आलो आहोत, एकमेकांशी बोलण्यासाठी आणि मैत्रीपूर्ण संवाद साधण्यासाठी. पण कधीकधी, एक वाईट माणूस सगळ्यांसाठी सर्व काही खराब करतो, असंही आफ्रिदीने म्हटलं आहे.दरम्यान, युवराज सिंग, सुरेश रैना, हरभजन सिंग, इरफान आणि युसूफ पठाण यांनी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यातून माघार घेतली. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या नाराजीमुळे हा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झाले होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# निलेश साबळेने स्टार प्रवाहवर का केली एन्ट्री? स्वत:च सांगितलं- नाही म्हणायचं कारणंच नव्हतं...

**मुंबई:** स्टार प्रवाहचा लोकप्रिय कार्यक्रम शिट्टी वाजली रेचा महाअंतिम सोहळा येत्या २ आणि ३ ऑगस्ट रोजी रंगणार आहे. महाअंतिम सोहळ्यात सेलिब्रिटी जोड्यांची धमाल अनुभवता येईल. तसेच वाहिनीवरील अनेक कलाकार या कार्यक्रमात सहभागी होतील. पण या भागाचे खास आकर्षण डॉ. निलेश साबळे आणि सिद्धार्थ जाधवची ठरणार आहेत. सिद्धार्थ जाधवच्या आता होऊ दे धिंगाणा या कार्यक्रमाचा चौथा सीझन ९ ऑगस्टपासून सुरू होतो आहे. त्यानिमित्ताने तो शिट्टी वाजली रेच्या मंचावर उपस्थित राहणार आहे. मात्र या शोमध्ये निलेशला पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या.



निलेशने जवळपास १० वर्ष सूत्रसंचालन केलेला चला हवा येऊ द्या हा कार्यक्रम झी मराठीवर येत्या २६ जुलैपासून सुरू होणार आहे. यादरम्यान निलेशने स्टार प्रवाहच्या शोमध्ये एन्ट्री केल्याने प्रेक्षकांनाही धक्का बसला. स्टार प्रवाहच्या कार्यक्रमात निलेश साबळे त्याच्या खास शैलीत शिट्टी...च्या टीमचं कौतुक करण्यासाठी आणि खास पदार्थांची चव चाखण्याकरिता उपस्थित राहणार आहे. याशिवाय तो सुपर्णा श्यामसोबत खास पदार्थही बनवताना दिसेल.स्टार प्रवाहसोबत पहिल्यांदाच कार्यक्रम करताना निलेशने उत्सुकता व्यक्त केली. त्याने असे म्हटले की, स्टार प्रवाह वाहिनीसोबतचा हा माझा पहिलाच प्रोजेक्ट आहे.

स्टार प्रवाहचे अनेक कार्यक्रम मी पाहतो. आता होऊ दे धिंगाणा आणि शिट्टी वाजली रे हे दोन्ही कार्यक्रम माझ्या आवडीचे आहेत. त्याने असे म्हटले की, स्टार प्रवाहने इतक्या आपुलकीने आणि प्रेमाने जेव्हा या कार्यक्रमासाठी विचारलं, तेव्हा नाही म्हणायचं काही कारणच नव्हतं. शिट्टी वाजली रेच्या मंचावरचा दिवस माझ्यासाठी अतिशय गंमतीदार ठरला. मला स्वयंपाक बनवता येत नाही पण माझ्यासोबत अभिनेत्री सुपर्णा श्याम होती. त्यामुळे तिच्या साथीने मी पदार्थ बनवू शकलो. स्टार प्रवाहच्या कुटुंबात माझा प्रवेश झालाय त्यामुळे अतिशय आनंद होतोय. निलेशच्या एन्ट्रीचा जो प्रोमो शेअर करण्यात आला आहे, त्यात तो म्हणतोय की, नमस्कार, सुस्वागतम, मी डॉ. निलेश साबळे तुम्हा सर्वांचं अतिशय मनापासून स्वागत करतो... महाराष्ट्राच्या नंबर वन महाखाद्य महोत्सवात! ज्याचं नाव आहे- शिट्टी वाजली रे. त्यामुळे जरी निलेश या शोमध्ये पाहुणा म्हणून सहभागी होणार असला, तरी त्याच्या सूत्रसंचालनाची झलकही पाहायला मिळणार आहे.

# कल्याण-डोंबिवलीत महिला सुरक्षित नाहीत? मराठी तरुणीला मारहाण, आज एक नवीन प्रकरण उघडकीस

**डोंबिवली :** कल्याण डोंबिवलीत महिला सुरक्षित नाहीत असाच प्रश्न पडला आहे. कल्याणमधील मराठी तरुणीला क्लिनिकमध्ये परप्रांतियाकडून मारहाणीचे प्रकरणं ताजे असताना एका तरुणाने अल्पवयीन तरुणीचा पाठलाग करत तिला ब्लॅकमेल केल्याची घटना डोंबिवलीत घडली आहे. हा तरुण गेले अनेक महिने त्या मुलीचा पाठलाग करत आहे.१९ वर्षीय तरुणाचा अल्पवयीन अल्पवयीन मुलीचा पाठलाग करत होता. डोंबिवली शहरात चार ते पाच महिन्यांपासून अल्पवयीन मुलीचा तो तरुण पाठलाग करत होता. रिलेशनशिप ठेवल्यासाठी तिला सांगत होता जर तसे केले नाहीतर स्वत:ची नस कापुन आरोपीकडून ब्लॅकमेल केले. कॉलेज व इतर ठिकाणी जात असतांना पाठलाग करत होता. रिलेशनशिप ठेवण्याबाबत वारंवार बोलुन स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करुन विनयभंग करुन स्वताची नस कापून घेण्याची धमकी देत असे. या प्रकरणी टिळकनगर पोलिसांनी केला गुन्हा दाखल केला. आरोपीचे नाव स्वामी राठोड असे आहे. पोलिसांनी





या आरोपीचा शोध घेत त्याला अटक केली आहे.मंगळवारी कल्याणमध्ये क्लिनिकमध्ये एका परप्रांतिय तरुणाने महिला रिसेप्शनिस्टला मारहाण केली. नातेवाईंकासोबत आलेल्या या तरुणाने तरुणीवर लाथा बुक्क्याने मारहाण केली.

या संबंधीचे सीसीटीव्ही फुटेज सर्वत्र प्रसारित झाल्यानंतर सर्वत्रच घटनेविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. मनसे, शिवसेना ठाकरे गट, शिवसेना शिंदे गट, भाजप अशा सर्वच पक्षांनी आरोपीला अटक करुन कारवाई करण्याची मागणी केली. त्या आरोपीला काही तासांनंतर पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी मनसे नेते अविनाश जाधव यांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी पीडित तरुणीची भेट घेतली आणि तिला रुग्णालयात दाखल होण्यास सांगितले. तरुण सापडल्यास त्या योग्य धडा शिकवू असे सांगितले.

या दोन्ही घटनांमुळे कल्याण डोंबिवली शहराची प्रतिमा डागाळली आहे. महिला सुरक्षिततेबाबत शहरवासियांच्या मनात प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. त्यामुळे महिलांविरोधात कृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी त्यामुळे असे कृत्य कोणी करणार नाही अशी भावना जनमानसात व्यक्त केली जात आहे.

# मुंबई, ठाणे, पालघरला आज मुसळधार; कोकण, घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा अंदाज...

**मुंबई :** मुंबई, ठाण्यासह कोकणात दोन दिवसांपासून सरी बरसत आहेत. पावसाचा जोर गुरुवारीदेखील कायम असेल. या दरम्यान कोकणात व सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर पावसाचा रेड ॲलर्ट घोषित केला आहे. तर मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांना ऑरेंज ॲलर्ट देण्यात आला आहे.बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे. त्याचा मोठा प्रभाव प्रामुख्याने कोकण, मध्य महाराष्ट्र व घाटमाथ्यांवर दिसून येत आहे. यामुळेच कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसाठी गुरुवारी रेड अलर्ट असेल. त्याचवेळी मुंबईसह ठाण्यातही ऑरेंज ॲलर्ट देण्यात आला आहे, अशी माहिती प्रादेशिक हवामान विभाग प्रमुख शुभांगी भुते यांनी दिली.मुंबईत मंगळवारी सुरू झालेला पाऊस बुधवारी सायंकाळपर्यंत होता. मंगळवारी स.८.३० ते बुधवारी स. ८.३० या २४ तासांत कुलाबा येथे ८६.६ तर सांताक्रुझ येथे ८४.६ मिलीमिटर पावसाची नोंद झाली. हाच आकडा बुधवारी सायंकाळी साडे पाचपर्यंत (सकाळी साडेआठपासून) कुलाबा येथे २५ व सांताक्रुझ येथे ४२



मिलीमिटर इतका नोंदला गेला. बुधवारी दिवसभरात मुंबई शहरात २८.५७, पूर्व उपनगरात ३९.५० व पश्चिम उपनगरात ३५.०९ मिलीमिटर पावसाची नोंद झाली. ठाणे व नवी मुंबईतही दिवसभर पावसाच्या सरी कोसळत होत्याआता गुरुवारी उत्तर व दक्षिण कोकणात सर्वत्र पावसाचा अंदाज आहे. मुंबई शहर व उपनगरात काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल. अधून-मधून ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे.पूर्व विदर्भात २५-२६ जुलैदरम्यान धरण साठ्यात वाढ होऊन नदी-नाल्यांना पूर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसरात दरड कोसळणे, पुराची स्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आरोपीला बचावाची संधी मिळायला हवी; पुण्यात चिमुकलीवर अत्याचार करुन संपवलं, फाशीची शिक्षा रद्द



**पुणे :** पानशेतजवळच्या कुरण खुर्द येथे अडीच वर्षांच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार करत निर्घृण खून केल्याप्रकरणी आरोपीला पुण्याच्या विशेष न्यायालयाने ठोठावलेली फाशीची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केली आहे. मात्र, या प्रकरणात नव्याने युक्तिवाद ऐकण्याचे आदेश पुणे न्यायालयाला दिले आहेत.या खटल्यात महत्त्वाचा पुरावा ठरलेला डीएनए चाचणी अहवाल तयार करणाऱ्या तज्ज्ञांची साक्ष व उलटतपासणी नोंदवून आरोपीला स्वतःचा बचाव करण्याची पूर्ण संधी मिळायला हवी, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या एका निवाड्याच्या आधारे नोंदविले. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल व न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने बुधवारी हा निकाल दिला.संजय बबन काटकर, वय ३८ वर्षे, रा. कादवे, पानशेत, वेल्हे, असे या आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरोधात वेल्हे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. कुरण खुर्द येथील वस्तीत १५ फेब्रुवारी २०२१ रोजी घरासमोर खेळणाऱ्या चिमुकलीचे रिक्षातून अपहरण झाले होते. दुसऱ्या दिवशी हवेली तालुक्यातील मालखेड-थोपटेवाडी रस्त्यावरील पुलाच्या सिमेंटच्या मोरीत या मुलीचा मृतदेह आढळला होता.या मुलीवर लैंगिक अत्याचार करून खून केल्याचे शवविच्छेदनात निष्पन्न झाले होते. त्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी आठ पथके तैनात केली होती; तसेच आरोपीचे चित्रही समाजमाध्यमात व्हायरल केले होते. त्यानंतर मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीला रायगड जिल्ह्यातील दुर्गम भागातून जेरबंद केले होते.त्याच्याविरोधात पुण्याच्या विशेष न्यायालयात खटला चालविण्यात आला. त्यामध्ये १७ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. या साक्षींसह वैद्यकीय व डीएनए चाचणी अहवालाच्या आधारे आरोपीला वर्षभरातच फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. या निकालाविरोधात आरोपीने ॲड. रिबेका गोन्साल्विस यांच्यामार्फत उच्च न्यायालयात अपील केले. बचाव पक्षाने खटल्यातील डीएनए चाचणी अहवालावर शंका उपस्थित केली.या चाचण्यांची पद्धत, त्यासाठी वापरलेले सॉफ्टवेअर-किट, प्रयोगशाळेतील नोंदी मागवून आणि अहवाल तयार करणाऱ्या तज्ज्ञांची साक्ष-उलटतपासणी नोंदविण्याची मागणी केली. त्यानुसार, विशेष न्यायालयाने या तज्ज्ञांची साक्ष नोंदविली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याचा दाखला देऊन या मुद्द्यावर आरोपीला बचावाची पूर्ण संधी मिळाली पाहिजे, असा युक्तिवाद ॲड. गोन्साल्विस यांनी केला. उच्च न्यायालयाने तो ग्राह्य धरला.

फाशीची शिक्षा झालेल्या आरोपीला बचावाची योग्य संधी देणे अत्यंत आवश्यक असून, त्यामध्ये कोणतीही तडजोड होता कामा नये. डीएनए चाचणी अहवाल तयार करणाऱ्या तज्ज्ञांची साक्ष नोंदविली नसल्याने न्यायदानात अपयश आले असून, खटल्याला खीळ बसली आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने एका निवाड्यात नोंदविले आहे.

हे निरीक्षण या खटल्यालाही लागू होत असून, आरोपीला अतिरिक्त पुराव्यांसंदर्भात सर्व बाबींवर युक्तिवाद करण्याची संधी मिळाली पाहिजे, असे नमूद करत उच्च न्यायालयाने पुण्याच्या विशेष न्यायालयाला पुन्हा युक्तिवाद ऐकून घेत लवकरात लवकर निकाल देण्याचे निर्देश दिले.

## बाबू धीरज रखो, सब ओपन होगा; हनी ट्रॅपप्रकरणावरुन वडेट्टीवारांचा गिरीश महाजनांना सूचक इशारा





**नागपूर:** हनी ट्रॅप सीडीमध्ये कोण आहे ते आम्ही दाखवू, सगळे उघड होईल, "बाबू धीरज रखो जरा, सब ओपन होगा", असा इशारा काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मंत्री गिरीश महाजन यांना दिला.सीडी कुठे गायब झाली, असा सवाल गिरीश महाजन यांनी केला होता. यावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले, हनी ट्रॅपमध्ये नाशिक, पुण्यातील आहेत. सरकारचा खेळखंडोबा चालला आहे. कितीही आरोप झाले तरी बेशरमाच्या झाडाप्रमाणे आहेत. ट्रॅपमध्ये अनेक बडे अधिकारी आजी-माजी मंत्री फसले आहेत. लोढाने अनेकांकडून पैसे घेतले. किमान दोनशे कोटी रुपये वसूल केल्याची माहिती आहे. तो कुणाचा कार्यकर्ता आहे, त्यावर बोलणार नाही. झाकलेले चेहरे लवकरच बाहेर येतील, असेही वडेट्टीवार म्हणाले. नगरविकास खात्यात मुख्यमंत्र्यांची सही लागणार, याकडे लक्ष वेधले असता, मुख्यमंत्री आता सर्वच ठिकाणी बॉस आहेत. नागपूरचे वर्चस्व कायम ठेवण्यासाठी सर्वाधिकार त्यांनी आपल्या हातात ठेवले, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.शेतकऱ्यांना भिकारी म्हणणारे, सभागृहात रमी खेळणारे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे सरकारला आवडत असल्यास कारवाई करू नये, अन्यथा त्यांना एक क्षणही पदावर ठेवू नये,

असा हल्ला विजय वडेट्टीवार यांनी चढवला.राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री नागपूरचे असताना तिथेच मुली सुरक्षित नाहीत. मुलींच्या वसतिगृहात शिरून आरोपींनी विनयभंग केला. या वसतिगृहात पुरेशी सुरक्षा नाही, सीसीटीव्ही नाही, कोणाच्या भरवश्यावर मुली इथे राहतील? या मुलींचे मोबाइल चोरले गेले.

गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरला नाही का, वसतिगृहातील मुली प्रचंड घाबरल्या असून त्यांना सुरक्षेची हमी कोण देणार, असे सवाल विजय वडेट्टीवार यांनी समाजमाध्यमातून केले. आरोपींना तत्काळ अटक करावी, मुलींच्या वसतिगृहाची सुरक्षा वाढवावी, तत्काळ सीसीटीव्ही बसवावे, तसेच राज्यातील सर्व मुलींच्या वसतिगृहात खबरदारी घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना पाठवले सक्तीच्या रजेवर...

**पंढरपूर :** आषाढी वारीदरम्यान विठ्ठल रुक्मिणी मंदिर दर्शन रांगेत पत्रा शेड. त्याचबरोबर बॅरिगेटिंग या कामांसाठी ठेकेदाराकडून पैसे घेतल्याचा आरोप मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्यावर करण्यात आला होता. याबाबतचा एक व्हॉईस रेकॉर्डिंग समोर आलं होतं. याच व्हॉईस रेकॉर्डिंगवरुन मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते. या प्रकरणी आता श्रोत्री यांच्यावर मोठी कारवाई करण्यात आली आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीची आज महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत श्रोत्री यांच्यावरील आरोपांबाबत चर्चा झाली. या बैठकीत मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना सक्तीच्या सुट्टीवर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.या प्रकरणी आता सखोल चौकशी केली जाणार आहे. मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी खरंच ठेकेदारांकडून पैसे घेतले का याची चौकशी करण्यासाठी आता एक कमिटी नेमली जाणार आहे. ही कमिटी आठ दिवसांत चौकशी करुन योग्य तो निर्णय देणार आहे. या दरम्यान व्यवस्थापकांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं आहे. कमिटीचा निर्णय येईपर्यंत मनोज श्रोत्री यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय आज मंदिर समितीच्या झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या सविस्तर घटनेची चौकशी करून मंदिर समितीने हा निर्णय घेतला असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली."मंदिर समितीची आज बैठक झाली. या बैठकीत अनेक लोकांच्या तक्रारी होत्या. या तक्रारी २६ तारखेपासून ते १६ तारखेपर्यंतच्या तक्रारी होत्या. या तक्रारीत दोन-तीन महत्वाचे विषय होते. पहिला विषय हा पूर्ण मंदिराच्या यात्रेच्या काळात टेंटचा विषय होता. त्या संदर्भात मंदिर व्यवस्थापकांनी काही पैसे घेतल्याच्या व्हिडीओ क्लिप्स व्हायरल झाल्या होत्या. त्याच पार्श्वभूमीवर आज मंदिर व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. त्यासाठी एक समिती गठीत केली आहे. ती समिती येत्या आठ दिवसांत सगळा अहवाल देईल", अशी माहिती गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# युरिया व खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्या कृषी केंद्रावर कारवाई करा-क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

जनसंचलन/बुलढाणा

निसर्गाची अवकृपा आणि त्यातच किड व अळ्यांचा प्रादुर्भाव यामुळे शेतकरी अडचणीत आलेले आहेत. अशा परिस्थितीत आता कृषी केंद्र चालक देखील शेतकऱ्यांवर अन्याय करत असल्याचे दिसून येत आहे. युरिया आणि खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण करण्यात आला असून लिंकिंगच्या नावाखाली शेतकऱ्यांचे आर्थिक लूट केली जात आहे. सदर लूट तातडीने थांबवावी अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना यासंदर्भात निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद आहे की बुलढाणा जिल्ह्यामध्ये सर्वत्र सध्या युरिया खताचा मोठ्या प्रमाणात कृत्रिम तुटवडा निर्माण करण्यात



आला आहे. शेतकरी युरिया व खतांची मागणी करण्यासाठी कृषी केंद्रावर गेले असता त्यांना लिंकिंगच्या नावाखाली दुसरी खते जबरदस्तीने घ्यावी लागतात. अतिवृष्टी, दुबार पेरणी आणि अळीचा प्रादुर्भाव यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहे त्यात आता कृषीकेंद्र चालक देखील शेतकऱ्यांची अडवणूक करून त्यांचे आर्थिक लूट करत असल्याचे दिसून येत आहे. युरिया खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्या तसेच लिंकिंग च्या नावाखाली शेतकऱ्यांची आर्थिक लुबाडनुक करणाऱ्या कृषी केंद्र चालकांवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. निवेदन देताना अमोल मोरे महेंद्र जाधव विकास उगले संदीप इंगळे आकाश हिवाळे सतीश उगले यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# बुलढाण्याची स्वच्छता अकोल्याच्या कुमोदिनी कडे!

## शहर स्वच्छतेसह नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आ.गायकवाडाचे एक पाऊल

जनसंचलन/बुलढाणा

पावसाळ्याला सुरुवात होताच, अनेक संसर्गजन्य रोंगाचा फैलाव वाढण्यास सुरुवात होते. त्याचा विपरित परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊन साथ रोंगानी नागरिक हैराण होताना दिसून येतात. मात्र, बुलढाण्याच्या पटलावर एक कर्तव्यदक्ष आमदार म्हणून ज्यांच्याकडे पाहल्या जाते, असे आ. संजय गायकवाड व न.प. मुख्याधिकारी गणेश पांडे यांच्या पुढकारातून शहर स्वच्छतेचे काम आता अकोल्याच्या कुमोदिनी या संस्थेकडे देवून स्वच्छ शहर, सुंदर शहर ही संकल्पना रुजविण्यासाठी एक पाऊल टाकले आहे. हिल स्टेशन म्हणून ओळख असलेल्या बुलढाणा शहराला गत काही महिन्यापासून घाणीचा विळखा निर्माण झाला होता. याचे कारणही तसेच आहे. पूर्वी ज्या ठेकेदाराकडे स्वच्छतेचे काम देण्यात आले होते. त्याचे काही देयक थकल्याने शहर स्वच्छतेच्या कामात अडथळा निर्माण झाला होता. मात्र, नागरिकांच्या आरोग्याची चिंता करणारे आमदार संजय गायकवाड यांच्या ही बाब लक्षात येताच, त्यांनी मुख्याधिकारी गणेश पांडे यांच्याशी चर्चा करुन स्वच्छते संदर्भात तडजोड नाही, अशी भूमिका घेत दुसरा पर्याय निवडण्याचे सांगितले. त्यासाठी शहरातील एका नामांकित पतसंस्थेकडे तसा प्रस्ताव ठेवण्यात आला मात्र, नकारघंटा मिळाली. परंतु कुठल्याही कामाच्या बाबतीत एकदा जो निर्णय घेतला, मग त्यात मागे न हटणारे आ. संजय गायकवाड यांनी मुख्याधिकारी पांडे यांच्याशी चर्चा करुन शहर स्वच्छतेचे काम अकोल्याच्या कुमोदिनी या संस्थेकडे सोपविले. कुमोदिनी संस्थेनेही शहर स्वच्छतेची घेतलेली जबाबदारी १ जुलैपासून हाती घेत शहरस्वच्छतेची मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे.




बुलढाणा नगर पालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत बुलढाणा शहरातील घरोघरी, सार्वजनिक ठिकाणी व सर्व स्तरावर दैनंदिन निर्माण होणारा ओला-सुका कचरा संकलन करणे, रस्ते, नाल्याची सफाई, संकलित केलेला गाळ, कचरा बंद वाहनातुन न.प.च्या क्षेपणभूमीवर नेऊन टाकणे, ही कामे १ जुलैपासून शहरात कुमोदिनी रिसोर्स मॅनेजमेंट अकोला, ही दररोज करत असून, स्वच्छ शहर, सुंदर शहर ही संकल्पना राबवत आहे. सध्या शहरात कुमोदिनी च्या वतीने जेसीबी, पोकलॅंड, टिप्पर, ८ ट्रक्टर ट्रॉली इत्यादी स्वत:ची मशिनरी आणि नगर परिषदेच्या २२ घंटागाड्या व १४० कामगाराद्वारे शहर स्वच्छतेची मोहीम राबवित आहेत. या हेल्पलाईन नंबरवर करा कॉल शहरातील कोणत्याही भागात रस्ते, नाले, साफसफाईच्या समस्या असतील, तर तात्काळ मे.कुमोदिनी रिसोर्स मॅनेजमेंट, अकोलाच्याचे कंत्राटदार पंकज काळे यांच्याशी शहरातील नागरिकांनी (९३५९४७४०१४) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अनंता मिसाळ यांना राज्यस्तरीय कृषी भूषण पुरस्कार प्रदान...

जनसंचलन/बुलढाणा




बुलढाणा तालुक्यातील भादोला येथे राहणारे श्री अनंता अर्जून मिसाळ यांना तेजस बहुउद्देशीय सामाजिक संस्था नाशिक यांच्या वतीने राज्यस्तरीय कृषी भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. श्री अंनता अर्जून मिसाळ हे सामाजिक कार्यात सक्रीय आहे त्यामुळे संस्थेच्या पुरस्कार निवड समितीने त्यांच्या साहित्य कार्याची दखल घेउन दि १० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता राजकमल लॉन्स विठुराज पेट्रोल पंपच्या मागे बारागाव पिंप्री रोड सिन्नर नाशिक रोड या ठिकाणी त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे

# पैनगंगा अर्बण को-ऑप क्रेडिट सोसायटी मर्या. बुलडाणा च्या व्यवस्थापकीय संचालक पदी प्रविण काळे यांची नियुक्ती...

जनसंचलन/बुलडाणा



बुलडाणा शहरामध्ये मागील १५ वर्षापासून सहकार क्षेत्रामध्ये अलैकीक कार्य करुन नावारुपास आलेले व्यक्तीमत्व म्हणजे प्रविण काळे यांची आज दि. २३ जुलै २०२५ रोजी पैनगंगा अर्बण च्या व्यवस्थापकीय संचालक पदी संस्थेचे अध्यक्ष श्री किशोर पाटील यांनी निवड केली नुकतेच भव्य असे उघाटद्न झालेल्या डि एस डि सिटी मॉल मध्ये स्थित पैनगंगा अर्बन चे पहिली मासिक सभा पार पडली या सभेमध्ये नुकतेच स्व. रामभाऊजी लिंगाडे पतसंस्थेमधील कार्यमुक्त इ गालेले प्रविण काळे यांना मागील १५ वर्षाचा व्यवस्थापक पदाचा कामकाज संभाळले आहे. सहकार क्षेत्रामध्ये प्रर्दिघ असा अनुभव असलेले प्रविण काळे यांनी व्यवस्थापकीय संचालक पदी निवड करावी या ठरावाला सर्वांनुमते मंजूरात देवुन आज संस्थेचे अध्यक्ष श्री किशोर पाटील तज्ञ संचालक नितेश थिगळे सचिव विजय कानडजे का. संचालक संजय गाढे व संचालक प्रदिप बेगाणी, अँड श्रीकांत जायभये यांनी सत्कार करुन पदभार घेण्यात आला. या वेळी पदभार स्विकारतांना व सत्काराला उत्तर देतांना प्रविण काळे यांनी सांगितले की मी माझ्या सहकार क्षेत्रातील असलेला अनुभवाचा आपल्या पैनगंगा अर्बन संस्थेची प्रगती नेण्याचा पुर्णपणे प्रयत्न करेन. या वेळी संस्थेचे सर्व संचालक व कर्मचारी उपस्थित होते.



# ओ माय खोटी तक्रार नको देत जाऊ!

**जनसंचलन/ चिखली**

घरात घुसून सैनिकाच्या पत्नीशी लगड करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी महावितरणचे भरारी पथकातील अभियंता अशीष देशमुख यांच्यावर १८ जुलैला गुन्हा दाखल झाला होता.दरम्यान परस्पर तक्रारीनंतर आता ४८ हजार २३० रुपयांची विज चोरी उघडकीस आल्याची तक्रार सदर अभियंत्याने दिली आहे. बातमी अशी आहे की, विद्युत मीटर तपासण्याच्या नावाखाली भर दुपारी घरी जाऊन सैनिकाच्या पत्नीशी वाईट उद्देशाने लगट करणाऱ्या महावितरणच्या भरारी पथकामधील एका अभियंत्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.आशिष देशमुख रा.महावितरण विद्युत कंपनी, भरारी पथक बुलढाणा, असे आरोपीचे नाव माहित पडले.ही घटना चिखलीतील श्रीकृष्ण नगरात समोर आली होती. तक्रार करणाऱ्या महिलेचा पती काश्मीर येथे भारतीय सैन्य दलात कार्यरत आहे.परंतु या प्रकरणाला कलाटणी मिळाली असून,सदर अभियंत्याने तक्रार दिल्यावर जालना रोड परिसरातील महावितरणच्या पथकाने केलेल्या तपासणीत ४८ हजार २३० रुपयांची वीज चोरी केल्याचे उघडकीस आले आहे.भगवान रामेश्वर काळे यांच्या नावावर असलेल्या घरातील वीज मीटर मध्ये अप्रामाणिक हस्तक्षेप करून अवैध वीज वापरण्याची ही तक्रार करण्यात आली आहे.१७ जुलैला ही कारवाई करण्यात आली.अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत कलोरे यांचे नेतृत्वाखाली पथकातील सहाय्यक अभियंता आशिष देशमुख, तंत्रज्ञ समाधान गायकवाड, गजानन पाटील, यांचा



समावेश होता.निकिता काळे यांच्या उपस्थितीत मीटर तपासणी दरम्यान मीटर बॉडी व सील मध्ये छेडछाड आढळून आली.तांत्रिक तपासणी मीटर ६६. ६७ टक्क्यांनी फिरत असल्याचे आढळून आले.यामुळे बारा महिन्यात १९६४ युनिट विजेचा वापर लपविण्यात आल्याचा निष्कर्ष समोर आला.याप्रकरणी बुलढाणा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# एवढा खादाडपणा कशाला? शेतकऱ्याला मागितली ७० हजारांची लाच!

## अखेर एसीबीच्या जाळ्यात! जिल्हा पुरवठा अधिकारी गजानन टेकाळेसह २ जणांना अटक!

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकऱ्याने शासनाच्या हमीभाव केंद्रावर ज्वारी विक्री केली होती.विक्री केलेल्या ज्वारीचे बिल काढून देण्यासाठी आणि कोणतीही अडचण पुढे येऊ नये म्हणून शेतकऱ्याला तब्बल ७० हजार रुपयांची लाच मागून पहिला हप्ता २५ हजार रुपये घेतांना पुरवठा अधिकारी व एक खाजगी इसम एसीबीच्या जाळ्यात रंगेहात सापडलाय.घटना आज येथील मुठ्ठे लेआउट व जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय बुलढाणा येथे घडली. जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयातील कार्यरत वर्ग दोन चा गजानन नंदकिशोर टेकाळे पुरवठा अधिकारी रा.खडकपुरा, चिखली व सेवानिवृत्त जिल्हा लेखा पर्यवेक्षक खाजगी इसम देवानंद गंगाराम खंडाळे रा.तानाजी नगर बुलढाणा असे या लाचखोराचे नाव आहे. शासनाचा गलेलठ्ठ पगार असूनही, सरकारी बाबू, अधिकारी यांना वर कमाईची प्रचंड हौस असल्याचे मागील विविध घटनांवरून दिसून येत आहे.गरिबांचे रक्तशोषण करून एवढा खादाडपणा कशाला? असा प्रश्न सर्वसामान्य जनता उपस्थित करत आहे. आजही दोन खादाडांना एसीबीच्या पथकाने जेरबंद केले आहे.जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयातील कार्यरत वर्ग दोन चा गजानन नंदकिशोर टेकाळे पुरवठा अधिकारी रा.खडकपुरा,




चिखली व सेवानिवृत्त जिल्हा लेखा पर्यवेक्षक खाजगी इसम देवानंद गंगाराम खंडाळे रा.तानाजी नगर बुलढाणा या दोन लाचखोरांनी एका शेतकऱ्याला लाच मागितली. शेतकऱ्यांनी शासनाच्या हमीभाव केंद्रावर ज्वारी विक्री केली होती.विक्री केलेल्या ज्वारीचे बिल निघण्यास कोणतीही अडचण येऊ नये आणि भविष्यात ज्वारी विक्री सुरळीत होईल म्हणून, आरोपींकडून शेतकऱ्याला ७० हजार रुपयांची मागणी करण्यात आली. या प्रकरणी २१ ते २३ जुलै पर्यंत एसीबीच्या पथकाने पडताळणी केली असता आरोपी टेकाळे व खंडाळे यांचा लुचाटपणा समोर आला. आरोपी विरोधात बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# भारतीय जनता युवा मोर्चा बुलडाणा तालुकाध्यक्ष पदी प्रतीक गायकवाड यांची नियुक्ती...

**जनसंचलन/बुलडाणा**

भारतीय जनता पक्षाचे नुकतीच कार्यकारिणी घोषित झाली. या कार्यकारिणी मध्ये भारतीय जनता युवा मोर्चा बुलडाणा तालुका अध्यक्ष पदी प्रतीक गायकवाड यांची नेमणूक झाली आहे. प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष ,मग स्वतः या तत्वाला धरून चालणारे नुकतीच भाजयुमो बुलढाणा शहर अध्यक्ष पद भूषविलेले प्रतीक गायकवाड यांची बुलढाणा तालुका भागात चांगली पकड आहे , हेच हेरून पक्ष संघटनेने त्यांना तालुका अध्यक्ष या पदावर बढती दिली. गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक गायकवाड सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी करत आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या कार्ये शैलीवर विश्वास ठेवून देशाचे नेते नरेंद्रजी मोदी यांना आदर्श मानून महाराष्ट्राचे नेते मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व रवींद्र जी चव्हाण साहेब प्रदेशाध्यक्ष व माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांच्या कार्यशैलीने प्रभावित होऊन व बुलढाणा जिल्ह्याचे नेतृत्व आदरणीय आमदार व कॅबिनेट मंत्री आकाश दादा फुंडकर साहेब, आमदार



श्वेता ताई महाले , आमदार चैनसुख जी संचेती साहेब , आमदार संजयजी कुटे साहेब, जिल्हाध्यक्ष भाजप विजयराज शिंदे साहेब, भाजयुमो जिल्हाध्यक्ष विनायकजी भाग्यवंत , भाजयुमो संघटन मंत्री वैभव लाड यांच्या मार्गदर्शनात बुलडाणा तालुका अध्यक्ष सतीश भाकरे यांनी पत्रकाद्वारे नियुक्ती केली. येणाऱ्या काळात बुलढाणा तालुक्यात युवकांचे संघटन मजबूत करून देव, देश ,धर्म, आणि पक्षासाठी कार्य करण्याचा मानस प्रतीक गायकवाड यांनी बोलून दाखविला आहे. निवडीबद्दल सर्व स्तरातून प्रतीक यांचे कौतुक होत आहे.

# परस्पर ठेकेदाराने केले रस्त्याचे काम सुरू, ग्रामपंचायतला माहीतच नाही!

**जनसंचलन/धाड**

कमिशनबाजीत ठेकेदार काय करतील हे सांगता येत नाही.याकडे लोकप्रतिनिधीसह जिल्हा यंत्रणेचेही दुर्लक्ष आहे.धाड येथे सिमेंट काँक्रीटीकरणचे काम सुरू झाले. परंतु ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच व सदस्य यांना यांची माहितीच नसल्याचा प्रकार समोर आला आहे. धाड येथे उपसरपंच किंवा कोणत्याच ग्रामपंचायत सदस्याला विश्वासात न घेता परस्पर कामाचे ठेके देऊन टाकायचे, आणि त्यात मोठाच भ्रष्टाचार करायचा असं सपाटा धाड ग्रामपंचायतीने लावलेला आहे.भ्रष्टाचार करण्यासाठी करडी धरणाच्या बुडीत क्षेत्रात काँक्रिट रस्ता बांधण्यात आला. त्याबाबत आज जिल्हाधिकारी बुलढाणा, मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद बुलढाणा, गटविकास अधिकारी पंचायत समिती बुलढाणा यांना भेटून चर्चा केली. दरम्यान ग्रामपंचायत उपसरपंच अभिमन्यू तायडे, ग्रामपंचायत सदस्य मो. रिझवान सौदागर, मोहम्मद रइस मोहम्मद खालील, सौ कल्पना प्रभाकर जाधव, सौ. निदा नाज मोहम्मद फहीम कुरेशी, सौ. समरिन मो. आसिफ, सौ. खातुन बी सय्यद गफ्फार, सौ. अझीमबी शे. रफीक यांनी निवेदन दिलेआहे.

